जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेस नोट **दिनांक – ३०/०४/२०२६**

" सन २०१४ मध्ये अपहरण केलेल्या इसमाचा खुन करून प्रेताची अज्ञातस्थळी विल्हेवाट लावणा–या तीघांना तब्बल १२ वर्षानंतर गुन्हे शाखा, घटक–०३, कल्याण यांनी केले जेरबंद "

सन २०१४ मध्ये इसम नामे करण अरविंद बागुल वय २३ वर्षे रा. दावडी गाव याचे अपहरण झालेबाबत मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ६४०/२०१४ भा.द.वि.सं. ३६५ प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाचा तपास करीत असताना गुन्हे शाखा, घटक –०३, कल्याण कडील अधिकारी व अमंलदार यांना मिळालेल्या गोपनिय बातमीवरून संशयीत आरोपीत चंद्रकांत बाळाराम गायकर वय ३९ वर्षे राह:– गायकर कंम्पाऊड, दावडी रोड, डोंबिवली पुर्व यास सदर गुन्हयात अटक करून त्याचेकडे केलेल्या कौशल्यपुर्वक तपासात १) सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष, धंदा कंन्स्ट्रक्शन, रा. एकविरा बंगला, श्री धनलक्ष्मी अपार्टमेंट बिल्डींग नंबर ५, मोती मिठाईवाल्याचे मागे, दावडी, डोंबिवली पुर्व यांने सदर गुन्हयातील अपहरत व्यक्ति करण अरविंद बागुल याचेसोबत जमीन विकसित करण्याच्या आर्थिक देवाणघेवाणचे कारणावरून झालेल्या वादातुन दि. ०४/१०/२०१४ रोजी सदर गुन्हयातील अपहरत व्यक्ती करण अरविंद बागुल याचे अपहरण करून त्यास धनलक्ष्मी अपार्टमेंट दावडी गाव येथील ऑफिसमध्ये नेवुन, तेथे सुरेंद्र पांडुरग पाटील याने त्याचेकडे असलेल्या लोखडी रॉडने करण अरविंद बागुल याचे तोंडावर तसेच डोक्यावर, कपाळावर जोरदार फटके मारून त्यास जिवे ठार मारून त्याचा खुन केला. त्यांनतर त्याचदिवशी अपहरत व्यक्ती करण अरविंद बागुल याचे प्रेत आरोपीत सुरेंद्र पांडुरग पाटील याने त्याचेकडे बिल्डींगचे साईटवर कामास असणारे साथीदार आरोपीत २) चंद्रकांत बाळाराम गायकर वय ३९ वर्षे राह:– गायकर कंम्पाऊड, दावडी रोड, डोंबिवली पुर्व ३) सुरेश गोपाल देगावत उर्फ छोटू वय ३२ वर्षे राह:– सध्या राह:– दत्ता पाटील चाळ, रूम नंबर ०२, निरानगर, निरा निवास, म्हसोबा चौकाजवळ, ठाकुर्ली ता. कल्याण जि. ठाणे यांचे मदतीने आरोपीत सुरेंद्र पांडुरंग पाटील याचे स्वत:चे मालकीचे स्विफ्ट कारमधुन दावडी गाव, डोंबिवली पुर्व येथुन प्रेत घेवुन जावुन बारवी डॅमच्यापुढे मुरबाड, जि. ठाणे येथील घनदाट जंगलात अज्ञास्थळी सदर प्रेताची विल्हेवाट लावली असल्याचे निष्पन्न झाले. मुरबाड येथील जंगलात प्रेताची विल्हेवाट लावलेल्या ठिकाणबाबत खात्री करता सदरबाबत मुरबाड पोलीस ठाणे येथे दि. ०७/१०/२०२४ रोजी अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आलेबाबत अकस्मात मृत्यु रजि नं. ४७/२०१४ अन्वये दाखल असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. मुरबाड पोलीस ठाणे हददीत घनदाट जंगलात १२ वर्षापुर्वी मिळुन आलेल्या अनोळखी इसमाचे प्रेताबाबत खात्री करता सदरचे प्रेत हे मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ६४०/२०१४ भादवि कलम ३६५ मधील अपहरत व्यक्ती करण अरविंद बागुल याचे असल्याचे तपासाअंती निष्पन्न करण्यात आले आहे. त्यामुळे सदर गुन्हयात भा.द.वि.सं. ३०२, २०१, ३४ ही कलमे सामील करण्यात आली आहेत.

तरी गुन्हे शाखा, घटक–०३ कल्याण यांनी सुमारे १२ वर्षापुर्वी खुन करून त्याचे प्रेताची अज्ञातस्थळी विल्हेवाट लावल्याचा अतिशय गंभीर गुन्हा कौशल्यपुर्वक उघडकिस आणला आहे. सदर गुन्हयाचे आतापर्यंत झाले तपासात आरोपीत सुरेंद्र पांडुरंग पाटील यांने ज्या लोखंडी रॉडने मयत इसम करण अरविंद बागुल याचा खुन केला होता.तो लोखंडी रॉड जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी १) सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष, २) चंद्रकांत बाळाराम गायकर वय ३९ वर्षे, ३) सुरेश गोपाल देगावत उर्फ छोटू वय ३२ यांची दिनांक ०२/०५/२०२६ रोजी पावेतो मा.न्यायालयाकडुन पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, नेम. गुन्हे शाखा, घटक–३, कल्याण हे मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

सुरेंद्र पांडुरंग पाटील, वय ५५ वर्ष हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी दाखल असलेले गुन्हे अभिलेख खालील प्रमाणे,

अ.क्र.	पोलीस ठाणे	गुन्हा रजि. नंबर व कलम
१	मानपाडा पोलीस ठाणे	I ६४०/२०१४, भा.द.वि.कलम ३६५
२	मानपाडा पोलीस ठाणे	I ८३/२००९, भा.द.वि.कलम ४५२, ४२७, ३४
३	मानपाडा पोलीस ठाणे	II २८/२०११, एमआरटीपी ॲक्ट ४३, ५२
४	कोळशेवाडी पोलीस ठाणे	I १९८/२०२१, भा.द.वि.कलम ५०९, ५०७
५	मानपाडा पोलीस ठाणे	I ५०९/२०१८, भा.द.वि.कलम ३२४, ३५२, ३२३, ५०४, ५०६(२), ३४ सह मपोकाक ३७(१)१३५
६	मानपाडा पोलीस ठाणे	I ८३२/२०२२, भा.द.वि.कलम ३३६, १७०, ५००, सह फौजदारी कायदा (सुधारणा) चे कलम ३ सह शस्त्र अधिनियम कलम ३० प्रमाणे
७	मानपाडा पोलीस ठाणे	I ८३४/२०२२, शस्त्र अधिनियम कलम ४, २५ सह मपोकाक ३७(१)१३५.
८	मानपाडा पोलीस ठाणे	I ९७३/२०२३, आर्म ॲक्ट कलम ३, २५ सह मपोकाक ३७(१)१३५.
९	मानपाडा पोलीस ठाणे	I ७८८/२०२४, भा.द.वि.कलम ३५४, ५०९, ५०६(२), ३२३, सह आर्म ॲक्ट कलम ४, २५
१०	मानपाडा पोलीस ठाणे	I ७८९/२०२४, आर्म ॲक्ट कलम ४, २५ सह मपोकाक ३७(१)१३५.
११	मानपाडा पोलीस ठाणे	३४१/२०२५, भा.न्या.सं. ६४, ७४, ११५(२), ३५१(२), ३(५) सह आर्म ॲक्ट कलम ३, २५..
१२	डोंबिवली पोलीस ठाणे	२६७/२०२५, भा.द.वि.क ३७६(२), ५०४, ५०६.
१३	महात्मा फुले चौक पोलीस ठाणे	II ३६/२०२१, भारतीय विद्युत कायदा कलम १३५
१४	मानपाडा पोलीस ठाणे	२८३/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३,४,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ प्रमाणे

सदरची कामगिरी मा. श्री. आशुतोष डुंबरे सो, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा. श्री पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर व मा. श्री. शेखर बागडे, सहायक पोलीस आयुक्त, शोध–१, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे, सहा.पो.निरी. सर्जेराव पाटील, सहा.पो.निरी. बळवंत भराडे, पोउपनिरी किरण भिसे, सपोउपनिरी दत्ताराम भोसले, सहा.पो.उप निरी. बालाजी शिंदे, पोहवा/विजय जिरे, पोहवा/पांडुरंग भांगरे, पोहवा/सुधीर कदम, पोहवा/सचिन भालेराव, पोहवा/विलास कडु, पोहवा/सचिन कदम, पोहवा/आदिक जाधव, पोहवा/गोरक्षनाथ पोटे, पोहवा/प्रशांत वानखेडे, पोहवा/उल्हास खंडारे, पोना/दिपक महाजन पोना/प्रविण किनरे, पोशि/गुरूनाथ जरग, पोशि/मिथुन राठोड, पोशि/विनोद चन्ने, पोशि/गणेश हरणे, पोशि/गोरक्ष शेकडे, पोशि/जालिदंर साळुंखे पोशि/सतिश सोनावणे व म.पो.शि./मंगल गावित चालक पोहवा/सपोउपनि बोरकर, सर्व नेम. गुन्हे शाखा, घटक–३, कल्याण यांनी केलेली आहे.

————०००००————